# नाशिक महानगरपालिका,नाशिक

## जाहिरात व परवाने विभाग

राजीव गांधी भवन (मुख्यालय), शरणपुररोडनाशिक -४२२ ००२

**दिपावली - २०२५ निमित्त,तात्पुरता फटाके विक्री स्टॉल करीता खुल्या जागांची जाहिर लिलाव सविस्तर अटी-शर्ती**

दिवाळी - २०२५ करीता,नाशिक महानगरपालिकेच्या विभागनिहाय निश्चित केलेल्या खुल्या जागा(क्षेत्र १० X १५ चौ.फुट आकारमानाचे स्टॉलकरीता उपलब्ध जागेनुसार निश्चित केलेली जागा) दि.१४/१०/२०२५ ते दि.२३/१०/२०२५ अखेर पावेतो,तात्पुरते स्वरुपात फटाके विक्री करीता मनपा अटी-शर्ती नुसार,खालील परिशिष्टात नमुद खुल्या जागांचा जाहिर लिलाव प्रक्रीया,संबंधित विभागीय अधिकारी यांचे नियंत्रणात (१) प्रथम लिलाव प्रक्रीया दि.०६/१०/२०२५ रोजी वेळ दु.२.०० वा. (२) प्रथम लिलाव प्रक्रीयेतील प्रतिसाद न मिळालेल्या जागांकरीता व्दितीय लिलावप्रक्रीया दि.०७/१०/२०२५ रोजी दु.२.०० वा आयोजित करणेत आली आहे.तरी इच्छुकांनी लिलावाच्या दिवशी वेळेत उपस्थित राहुन लिलाव अटी- शर्तीची पुर्तता करुन लिलावात सहभाग घेता येईल.

| विभाग | अक्र. | जागेचे ठिकाण | एकुण स्टॉल संख्या | लिलावाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| नाशिक पुर्व | १ | युनिक मैदानाशेजारी चेतनानगर राणेनगर कॉर्नर सर्व्हे नं ८८४ /८८५ शारदा विद्यालय समोरील मोकळा भुखंड | (१ ते १०) | मनापाचे विभागीय कार्यलय नाशिक पुर्व दगडी इमारत मेनरोड,नाशिक येथील सभागृहात |
| | २ | पोर्णिमा बस स्टॉप समोरील खुल्या जागेत | (१ ते ६) | |
| नाशिक पश्चिम | ३ | गोल्फ क्लब ईदगाह मैदान | (१ ते ५०) | मनापाचे विभागीय कार्यलय नाशिक पश्चिम नवीन पंडीत कॉलनी,नाशिक येथील सभागृहात (पहिला मजला) |
| | ४ | संदिप हॉटेल समोरील मोकळी जागा | (१ ते १०) | |
| पंचवटी | ५ | आर.टी.ओ. ऑफिस समोरील मोकळ्या जागेत, पेठरोड, पंचवटी | (१ ते २) | मनपाचे विभागीय कार्याल पंचवटी,मखमलाबाद नाका कै.पंडितराव खैरे इमारत मधील सभागृहात |
| | ६ | आडगांव एस.टी.स्टॅण्डजवळ मोकळ्या जागेत | (१ ते २) | |
| | ७ | दिंडोरीरोड आरटी ओ ऑफिसकडे जाणा-या लिंकरोड वरील जानकाई बंगल्याच्या दक्षिण बाजुस(लक्ष्मी बेकरीजवळ) असलेल्या खुल्या जागेत | (१ ते १०) | |
| | ८ | अमृतधाम सॅनिटोरियम भिंती समोरील विडीकामगार वसाहती कडे जाणा-या सर्व्हिस रोडलगत अग्निशमण दल कंपाऊंडल लागुन मोकळयार जागेत | (१ ते ५) | |
| | ९ | धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौक तारावाला नगर पंचवटी | (१ ते २) | |
| | १० | तपोवन येथील साधुग्राम समोरील मोकळया जागेस बस डेपो संरक्षक भिंतीलग | (१ ते १२) | |
| | ११ | गामणे मळा, मखमलाबाद रोड, रुंग्ठा श्री तिरुमला गुलमोहर बिल्डिंगसमोरील मोकळ्या जागेत | (१ ते ४) | |
| | १२ | बझ कॅफेसमोर, मखमलाबाद रोड येथील डी.पी. जवळील मोकळी जागा | (१ ते २) | |
| | १३ | दत्तराव सोसायटी समोरील पाटाजवळील मोकळी जागा, मखमलाबाद रोड, क्रिकेट टर्फ लगत | (१ ते २) | |
| | १४ | रुंग्ठा श्री तिरुमला गुलमोहर बिल्डिंगजवळील,श्री मानकर यांच्याऑफिसपुढील मोकळ्या जागेत | (१ ते ४) | |
| | १५ | बळीमंदीरजवळ, प्रमोद महाजन गार्डनच्या समोरील भंगार दुकानापुढील मोकळी जागा | १ ते २ | |
| | १६ | रामलीला मंगल कार्यालयापुढे पोलिस चौकी जवळ | (१ ते ३) | |
| | १७ | आडगांव मारुती मंदिरापुढील, समाजमंदीरजवळील मोकळी जागा | (१ ते २) | |
| | १८ | अमृतधाम चौफुली येथील मोकळी जागा | (१ ते ५) | |
| | १९ | कमल नगर चौक हिरावाडी | (फक्त १) | |
| | २० | श्रीकृष्ण मंगल कार्यालय शेजारी, गितानगर,म्हसरुळ येथील खुल्या जागेत | (१ ते ५) | |
| | २१ | मखमलाबाद गाव देवी मंदिरा समोरील खुल्या जागेत | (१ ते ५) | |
| | २२ | बळीमंदीरजवळ, प्रमोद महाजन गार्डनच्या गेटच्या बाजुला | (फक्त १) | |
| सातपुर | २३ | सातपुर क्लब हाऊस मैदान | (१ ते ५०) | मनापाचे विभागीय कार्यालय सातपुर येथील सभागृहात |
| | २४ | आंनदवल्ली,मनपा शाळेसमोर खुली जागा | (फक्त १) | |
| नविन नाशिक | २५ | जुने शॉपिंग सेंटर लेखा नगर पाठीमागे शिवाजीचौक भाजी मार्केट मोकळे मैदान | (१ ते ६) | मनापाचे विभागीय कार्यालय नविन नाशिक,अंबड पोलिस स्टेशन समोर नाशिक |
| | २६ | राजे संभाजी स्टेडीयम मैदान | (१ ते १५) | |
| | २७ | पवन नगर मिनी स्टेडीयम | (१ ते १५) | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| नाशिकरोड | २८ | प्रेस समोर के एन केला शाळे शेजारील मनपा मोकळया जागेत | (१ ते २०) | मनपाचे विभागीय कार्यालय नविन इमारत,दुर्गा गार्डन शेजारी, देवळाली, नाशिकरोड येथील सभागृहात |
| | २९ | गाडेकर मळयासमोर दत्तमंदिर जागेत | (१ ते १९) | |
| | ३० | मनपा नाटयगृह आरक्षित जागेत जेलरोड नाशिकरोड | (१ ते ३०) | |

## सविस्तर अटी - शर्ती

१. सदर लिलावात भाग घेणा-यास प्रत्येक स्टॉलच्या जागेसाठी अनामत र.रु.१५,०००/- लिलावापुर्वी आगाऊ भरणे तसेच रहिवासी पुरावासह स्वत:चे ओळखपत्राची छायांकीत प्रत(२ प्रतीत)साक्षांकीत करुन सादर करावी लागेल(जसे आधारकार्ड/निवडणुक ओळखपत्र/वाहन परवाना/पॅनकार्ड/लाईटबील/बैंक पासबुक)त्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही.

२. यशस्वी लिलाव धारकांस प्राप्त स्टॉलच्या जागेची अंतिम लिलाव बोलीप्रमाणे निश्चित केलेली जागा लायसेंस फी व त्यावरील शासनाचा वस्तु व सेवाकराची १८ टक्के,अग्निशमण फी,पर्यावरण शुल्क,इतर लायसन्स फी इ. लिलाव प्रक्रीया संपुष्टात आल्यानंतर,त्याच दिवशी किंवा लगतच्या दिवशी रोख स्वरुपात अथवा डिमांड ड्राफ्टने(नावे नाशिक महानगरपालिका,नाशिक)भरणा करणे अनिवार्य आहे.त्याशिवाय जागेचा ताबा मिळणार नाही.

३. यशस्वी लिलाव धारकाने लिलाव अटी-शर्ती प्रमाणे लिलावाची रक्कम मुदतीत न भरल्यास,आगाऊ भरणा केलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणेत येवुन सदरची जागा इतर मागणीधारकास वाटप करणेत येईल.

४. नाशिक महानगरपालिकेने उक्त परिशिष्ठात नमुद निश्चित केलेले ठिकाणे/जागा इ.मध्ये बदल करणे स्टॉलच्या जागेच्या संख्येत वाढ अथवा घट करणे.इ अधिकार राखुन ठेवल असुन त्यामध्ये काही कारणास्तव बदल झाल्यास सदर बदलानुसार तडतोड करणे यशस्वी लिलाव धारकावर बंधनकारक राहिल.

५. यशस्वी लिलावधारकाने मनपाच्या जागेवर शेडची उभारणी करणे, विस्फोटक नियम २००८ कलम ८४ मधील तरतूदीनुसार आगविरहीत साधनसामुग्रीची उभारणी करणे व त्यानंतर नाशिक मनपाच्या अग्निशमन विभागाकडून पाहणी करुन ना-हरकत दाखला व विद्युत वितरण कंपनीचा ना-हरकत दाखला प्राप्त करुन मा. पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांचे कडून फटाकेविक्री परवाना स्वत:च्या नांवावर स्वत: प्राप्त करणे इ. बंधनकारक असुन त्यानंतरच व्यवसाय करता येईल.असे न केल्यास यशस्वी लिलावधारक कायदेशिर कारवाईस पात्र राहील.

६. जागेचा नकाशा नाशिक महानगरपालिकेच्या संबंधित विभागीय कार्यालयाचे "जाहिरात व परवाने विभागात" कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

७. लिलाव सुरु होणेपुर्वी सविस्तर अटी-शर्तीचे वाचन करण्यात येवुन लिलाव प्रक्रिया सुरु करण्यात येईल.

८. लिलाव बोलीची किमान मर्यादा र.रु.५००/- या प्रमाणे असुन, त्यापटीने बोली लागेल व किमान ३ बोली नंतर लिलाव कायम करण्यात येईल.

९. यशस्वी लिलावधारकाने अग्निशमन विभाग, विद्युत विभाग, फटाके विक्री परवाना इ. परवानग्या प्राप्त करणे तसेच गाळयाची उभारणी करणे व इतर कामाकरीता दि.११/१०/२०२५ ते दि.१३/१०/२०२५, फटाके विक्री दि.१४/१०/२०२५ ते दि.२३/१०/२०२५ तसेच गाळे व इतर साहित्य काढणेचा दि.२४/१०/२०२५ या प्रमाणे कालावधी निश्चित आहे.

१०. यशस्वी लिलावधारकाने मनपाच्या जांगेवर स्वखर्चाने शेडची उभारणी करणे, विस्फोटक नियम २००८ कलम ८४ नुसार नियमांचे पालन करणे व आगविरहीत यंत्रणा उभारणी करणे बंधनकारक आहे.

११. यशस्वी लिलावधारकाने जागा लायसेन्स फी व्यतिरिक्त शासनाचा व्यवसाय कर भरणे क्रमप्राप्त आहे. याप्रमाणे भरणा केलेला नसल्यास अनामत रक्कम अदा केली जाणार नाही.

१२. नाशिक महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाचा ना-हरकत दाखला प्राप्त करणे बंधनकारक असुन, त्याकरीता असलेली प्रती दिन शुल्क रक्कम रु. ५००/- प्रमाणे आगाऊ भरणे बंधनकारक आहे.

१३. यशस्वी लिलावधारकाने मा. पोलीस आयुक्त, नाशिक शहर व जिल्हादंडाधिकारी (The Explosive Act, १८८४/२००८) यांचेकडे आवश्यक ते कागदपत्रे सादर करुन तात्पुरते स्वरुपातील फटाकेविक्रीचा परवाना रितसर प्राप्त करणे बंधनकारक आहे. तो पर्यंत फटाकेविक्री करणे अथवा साठा करणे इत्यादीस सक्त मनाई आहे.

१४.यशस्वी लिलावधारकाने, विद्युत व्यवस्था स्वखर्चाने करणे व त्यानुसार विद्युत पुरवठयाचे देयक स्वत: अदा करावयाचे आहे.

१५.विस्फोटक नियम २००८ कलम ८४ नुसारखालील नमुद नियमांचे पालन करणे यशस्वी लिलावधारकावर बंधनकारक आहे. त्याचे उल्लंघन झाल्यास कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

अ) **दोन गाळयांमधील सामासिक अंतर किमान ३ मीटर (१० फूट) ठेवणे बंधनकारक राहील**

आ)एकापेक्षा जास्त स्टॉल असतील तर त्याचे प्रवेशद्वार समोरासमोर ठेवता येणार नाही.

इ) एकाच ठिकाणी ५० पेक्षा जास्त स्टॉलची उभारणी करता येणार नाही.

ई) स्टॉलच्या ठिकाणी तेलाचा दिवा, आगपेटी, मेणबत्ती, इ. वस्तूंचा वापर कटाक्षाने टाळावा.

उ) फटाकाच्या स्टॉलकरिता आपत्कालीन मार्ग नेहमी खुला ठेवणे अनिवार्य आहे.

ऊ) गाळयाच्या बांधणीसाठी ज्वलनशील साधनसामुग्रीचा (कापड, प्लास्टीक, लाकूड इ.) वापर करण्यास सक्त मनाई आहे. गाळे शक्यतो पत्र्यापासुन बनविलेले असावेत.मात्र त्यावर कोणत्याही प्रकारचे पक्के बांधकाम करता येणार नाही.

१६. गाळयांमध्ये विद्युत संच, मांडणीमध्ये लोंबकळते दिवे लाऊ नयेत. विद्युत व्यवस्थेकरिता, विद्युत दिवे भिंत किंवा पट्टया घट्ट स्वरुपात लावलेले असावेत. तसेच विद्युतीकरणाचे उघडे जोड (Open Joints) ठेवु नये. विदयुत संच मांडणी शासनाचे विदयुत निरीक्षक, महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी लि. नाशिक यांचेकडून तपासणी करुन त्याबाबतचा सक्षम दाखला व्यवसाय परवानगी मागतांना घेतलेला असावा. तसेच विदयुत पुरवठा करतांना प्रत्येक गाळयात एक स्विच ठेवतांना जास्तीच्या एका रांगेतील गाळेंच्या ठिकाणी एक मुख्य स्विच ठेवणे बंधनकारक राहील.

१७.फटाके विक्रीच्या दुकानापासुन किमान ५० मीटर अंतराचे आत फटाके वाजविण्यास बंदी आहे. याबाबतचा खबरदारीचा फलक लावण्यात यावा.

१८.प्रत्येक गाळयांमध्ये अग्निशामक दलाच्या सूचनेनुसार किमान आवश्यक असलेली आगप्रतिबंधक उपाययोजना खालीलप्रमाणे करणे बंधनकारक आहे -

अ) A,B,C टाईप फायर एस्टींग्वीशर्स,६ किलोग्रॅम- १ नग ठेवावेत.

ब) बारीक वाळूच्या बादल्या- ०२ नग ठेवावेत.

क) पाण्याने भरलेली बादल्या -२००/५०० लिटर ठेवणे अनिवार्य.

ड) ध्रुम्रपान निषेध व आपत्कालीन संपर्क क्रमांक इ. फलक – दुकानाच्या दर्शनी भागात लावणे अनिवार्य आहे.

इ) फटाके विक्री गाळयांमध्ये ज्वालाग्राही द्रव्ये (पेट्रोल/डिझेल/रॉकेल व इतर इ.) चा साठा तसेच उघडया ज्योती /पेटती मेणबत्ती इ. चा वापर निषीध्द आहे.

१९. यशस्वी लिलावधारकाने प्राप्त केलेल्या जागेचे संबंधीत विभागाचे विभागीय अधिकारी व सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता यांचेकडुन रेखांकन करुन, त्यानुसार शेड/गाळा/स्टॉल ची उभारणी करणे अनिवार्य आहे.

२०.लिलावातील प्राप्त जागेंबाबत सरकारी खात्याकडुन अगर स्थानिक रहिवाशांकडुन तक्रारी प्राप्त झाल्यास, नियमाप्रमाणे परवानगी रद्द करण्यात येईल.

२१. एका व्यक्तिस/संस्थेस/गटास एकच जागा जाहिर लिलावात प्राप्त करता येईल.

२२.मा. न्यायालयाचे निर्देश, शासनाचे निर्देश/आदेश तसेच मा. जिल्हाधिकारी, नाशिक व मा. पोलीस आयुक्त, नाशिक शहर व नाशिक महानगरपालिका यांनी वेळोवेळी पारित केलेल्या आदेशाचे पालन करणे यशस्वी लिलावधारकावर बंधनकारक राहील.

२३. महाराष्ट्र शासनाने प्लास्टिक व थर्माकॉल वर बंदी असुन सदर नियमाचे पालन करणे अनिवार्य आहे.

२४. यशस्वी लिलावधारकाने जागे बाबत भरणा केलेली सुरक्षा अनामत मुदत संपल्यानंतर, जागा पुर्ववत स्वच्छ व जैसेथे करुन देणे बंधनकारक आहे.तद्नंतर अनामत रक्कम प्राप्त करणेकरीता मागणी अर्ज व त्या सोबत अंनामत रक्कमेची मुळ पावती तसेच मनपाचे इतर थकबाकी नसले बाबतचा दाखला सादर केल्यानंतर, अनामत रक्कम अदायगी करण्याची कार्यवाही अनुसरण्यात येईल.अटी शर्तीचा भंग केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल याची यशस्वी लिलाव धारकांनी नोंद घ्यावी.

२५.यशस्वी लिलावधारकाने प्राप्त केलेल्या जागेवर कुठल्याही प्रकारचे पक्क्या स्वरुपाचे बांधकाम करता येणार नाही.

२६.यशस्वी लिलावधारका कडुन जागेचे काही नुकसान केल्याचे आढळुन आल्यास, सदर जागेच्या दुरुस्तीकामी येणारा खर्च मनपा निश्चित करेल, व त्यानुसार सदरचा खर्चाची भरपाई, मुदतीत भरणा करणे अनिवार्य राहील.

२७. नैसर्गिक अथवा अनैसर्गिक कारणास्तव वित्त तसेच जिवीत हानी झाल्यास, त्याबाबतची कोणतीही जबाबदारी नाशिक महानगरपालिकेवर राहणार नाही.

२८.यशस्वी लिलावधारकाने, फटाके विक्री व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारचा व्यवसाय करता येणार नाही.

२९.यशस्वी लिलावधारकाने, कायदा व सुव्यवस्था यांचे काटेकोरपणे पालन करणे अनिवार्य आहे.

३०.यशस्वी लिलावधारकाने, फटाके विक्री करीता ठेवण्यात आलेला वस्तु/साहित्य इ. ची सुरक्षिततेची जबाबदारी स्व:ताची असुन, त्याकरीता आवश्यक त्या सुरक्षा बाबतच्या उपायोजना, स्वत: करणे अनिवार्य आहे. याबाबत काही दुर्घटना घडल्यास त्यास नाशिक महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

३१.यशस्वी लिलावधारकाने, मनपा मालकिच्या जागेचे कोणत्याही त-हेने हस्तांतर, पोटभाडेकरु, बक्षिस, गहाण, असाईनमेंट वगैरे करता येणार नाही. अगर गुडविलने जागा परस्पर दुस-यास बहाल करता येणार नाही. तसेच जागा संपूर्णपणे अगर अशंत: दुस-याच्या नावावर करुन देता येणार नाही. तसेच जागेत भागिदार घेता येणार नाही.

३२.यशस्वी लिलावधारकाने, जागेचा सर्व परिसर स्वच्छ ठेवणे व कचरा/निर्माल्य साफसफाई करुन तो एकत्र जमा केलेला कचरा/निर्माल्य घंटागाडीत टाकणे अनिवार्य आहे.

३३.यशस्वी लिलावधारकाने, प्राप्त केलेल्या जागेत व्यवसाय न केल्यास, भरणा केलेली जागा लायसेंस फी व त्यावरील वस्तु व सेवा कर इ. लिलावधारकास परत अदा केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

३४. वरील अटीचे उल्लघंन झाल्यास संबधितावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

सदर लिलाव मान्यकरणे अथवा कोणतेही कारण न देता नाकारणे / जागांचा लिलाव तहकूब/बदल करणे, नविन अटी-शर्तीचा समावेश करणे इ. अधिकार नाशिक महानगरपालिकेने राखुन ठेवलेले आहेत. नाशिक मनपाने निश्चित केलेल्या उक्त नमुद अटी-शर्तीचे पालन करणे लिलावात भाग घेणारे / यशस्वी लिलावधारकांवर बंधनकारक आहे.

दि. /०९/२०२५

Sd/-
(सुवर्णा दखणे)
उपआयुक्त(जापवि)
नाशिक महानगरपालिका,नाशिक